REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 11 | AUGUST - 2023

# ‘‘विदर्भातील शैक्षणिक संपादनाच्या संबंधात प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांच्या व्यक्तिमत्व घटकांचा तौलनिक अभ्यास’’

प्राचार्य डॉ. माणिक मारोतराव जोगवे
आर.बी.एम. अध्यापक महाविद्यालय, हट्टा, ता. वसमत, जि. हिंगोली.




२१ व्या शतकांचे आव्हान पेलण्याकरिता भारतीय युवा पिढी सक्षम व्हायला पाहिजे. त्याकरिता योग्य शिक्षण सर्वांना मिळणे आवश्यक आहे. देश स्वतंत्र होऊन ७५ वर्षे झाले असले तरी, भारतातील शिक्षणाची घडी अजून तरी सक्षम व समाधानकारक नाही. त्यादृष्टीने शिक्षकाचे महत्व फार आहे. चांगले शिक्षक मिळण्याची जी प्रक्रिया व्हायला पाहिजे ती होत नाही. त्यामूळे शिक्षक म्हणून ज्या व्यक्ति व्यवसायात येतात त्यांच्यात अनेक अवांच्छिक घटक दिसून येतात. त्यांची बौध्दिक, व्यावसायिक कुवत कमी असते. अध्यापनाप्रति अनेकांत उदासिनता दिसून येते. अध्यापक अभियोग्यता, रूची वा अध्यापक परिणामकारकता निम्न दर्जाची आढळून येते. ही परिस्थिती अतिशय गंभीर आहे. याला कारण शिक्षक निवड प्रक्रिया सदोष आहे. त्यामुळे जसे परिणामकारक शिक्षक व्यवसायाला मिळायला पाहिजे ते मिळत नाहीत.

चांगल्या इमारती, ग्रंथालये, दृक-श्राव्ये साधने, शैक्षणिक तंत्र विज्ञानाची साधने, दुरचित्रवाणी इ. असून जर व्यक्तिमत्व गुणवैशिष्ट्याने युक्त योग्यता धारक शिक्षक नसतील तर राष्ट्रीय संपतीचा अपव्यव केल्यासारखे होईल. असे होऊ नये व २१ व्या शतकाचे आव्हान पेलण्याकरिता योग्य शिक्षकाचे पदार्पण व्यवसायात होणे आजच्या घडीला आवश्यक आहे.

## संशोधन समस्येचे शीर्षक :-

‘‘विदर्भातील शैक्षणिक संपादनाच्या संबंधात प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांच्या व्यक्तिमत्व घटकांचा तौलनिक अभ्यास’’

## संशोधनाचे उद्दिष्ट्ये :-

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत -

१. प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांच्या शैक्षणिक संपादनांच्या गुणांची टक्केवारी प्राप्त करणे.
२. प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांचे (स्त्री/पुरूष) व्यक्तिमत्व घटक शोधणे.
३. शैक्षणिक संपादनाच्या टक्केवारीवरून प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांचे उच्च शैक्षणिक संपादन धारकांचे गट तयार करून त्यांचे व्यक्तिमत्व-व्यक्तिचित्र (Personality Profile) तयार करणे.
४. व्यक्तिमत्व-व्यक्तिचित्रातील विशेष व्यक्तिमत्व घटकांची विविध गटांच्या संबंधात मांडणी करणे.

५. स्त्री/पुरूष शिक्षकात कोणते व्यक्तिमत्व घटक आढळून येतात. ते मांडणे, त्यांची तुलना करणे.

## न्यादर्श :-

प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या विषयाची व्याप्ती व मर्यादा लक्षात घेऊन विदर्भातील ११ जिल्हयातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक ठरविले.

न्यादर्शात प्राथमिक शिक्षक ५० पुरूष/स्त्री मिळून, माध्यमिक शिक्षक ५० पुरूष/स्त्री मिळून, व उच्च माध्यमिक शिक्षक ५० पुरूष/स्त्री मिळून असे एकुण १५० शिक्षक निवडले.

## न्यादर्श पध्दती :-

शिक्षक, गांव व शाळांची निवड सहेतुक न्यादर्श पध्दतीने (Purposive Sampling Method) केली.

## संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधनाकरिता सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला.

## संशोधनाची साधने :-

प्राथमिक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षकांच्या व्यक्तिमत्व मापनाकरिता डॉ. कपूर यांनी संस्कारित केलेली कॅटलची १६ व्यक्तिमत्व घटक प्रश्नावली (फॉर्म 'ए') निवडली.

शैक्षणिक संपादन गुणांक हे प्राथमिक शिक्षकांकरिता इयत्ता १२ वी पास चे गुण, माध्यमिक शिक्षकांकरिता पदवी परिक्षेचे गुण व उच्च माध्यमिक शिक्षकांकरिता पदव्यूत्तर परिक्षेचे गुण आधारभूत म्हणून घेतले आणि त्याची टक्केवारी काढण्यात आली.

## कार्यपध्दती/माहिती संकलन :-

विदर्भातील ११ जिल्हयातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा निवडून मुख्याध्यापकांच्या परवानगीने शिक्षकांना त्यांचे व्यक्तिमत्व मापनाकरिता कॅटलची १६ व्यक्तिमत्व घटक प्रश्नावली देऊन ती कशी सोडवावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले व प्रश्नावली सोडविल्यानंतर, शिक्षकांची शैक्षणिक संपादना संबंधात माहिती घेतली. शेवटी त्या सर्व प्रश्नावली व्यवस्थितपणे भरूण दिल्या की नाही ते तपासले असता भरावयास दिलेल्या एकूण १५० प्रश्नावलीपैकी १३५ प्रश्नावली व्यवस्थित अचूकपणे भरलेल्या आढळल्या.

## गुणांकन :-

भरूण प्राप्त झालेल्या प्रश्नावलीचे गुणांकन मॅनुअल मधील सूचनानूसार करण्यात आले. त्यानुसार प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक पुरूष/स्त्री यांच्या नावापुढे शैक्षणिक संपादनाची गुणांची टक्केवारी लिहून त्यापुढे त्यांना प्राप्त झालेले व्यक्तिमत्वाचे प्राप्तांक व्यक्तिमत्व घटकानुसार लिहिण्यात आले.

## माहितीचे सांख्यकिय विश्लेषण अर्थनिर्वचन :-

सर्वप्रथम शैक्षणिक संपादनाच्या गुणांकाच्या टक्केवारीनूसार गुणांकानुक्रम लावून त्यापूढे त्या त्या शिक्षकांना व्यक्तिमत्व घटकांना जे गुण प्राप्त झाले ते त्या त्या घटकांच्या खाली दर्शविण्यात आले अशा तऱ्हेने प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांच्या (पुरूष/स्त्री) स्वतंत्र याद्या तयार केल्या, व त्यावर आधारित गुणांनुक्रमानूसार वरून २७ टक्के व खालून गुणानुक्रमे २७ टक्के शिक्षकांची निवड करून त्यावरून उच्च शैक्षणिक संपादन गुणांक व निम्न शैक्षणिक संपादन गुणांकधारक शिक्षकांच्या व्यक्तिमत्व घटकांच्या याद्या तयार केल्या. प्रत्येक यादीच्या शेवटी प्रत्येक व्यक्तिमत्व घटकाला जे अंक प्राप्त झाले होते त्याची बेरीज करून सरासरी प्राप्तांक काढण्यात आले. त्यावरून मॅनुअलनुसार त्या सरासरी प्राप्तांकाचे रूपांतर मानक दशक प्राप्तांकात करण्यात आले. त्यावरून शिक्षक गटाचे व्यक्तिमत्व व्यक्तिचित्र

(Personality Profile) तयार करण्यात आले. अशाप्रकारे व्यक्तिमत्व व्यक्तिचित्रावरून अर्थनिवर्चन करण्यात आले. त्यानंतर व्यक्तिमत्व घटकांच्या संबंधात तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला. त्या तक्त्यावरून अर्थनिर्वचन करण्यात आले.

### संशोधनाचे निष्कर्ष :-

प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष खालीलप्रमाणे-

### प्राथमिक शिक्षक -

१. उच्च शैक्षणिक संपादन गुणांकधारक प्राथमिक शिक्षकात (स्त्री) (L+) संशयी हा व्यक्तिमत्व घटक प्रामुख्याने आढळून आला.
२. निम्न शैक्षणिक संपादन गुणांकधारक प्राथमिक शिक्षकात(पुरूष) (B-) कमी बुध्दिमत्ता (G-) लाभदक्ष संधिसाधू (Q3-) अनियंत्रित, बेशिस्त हे व्यक्तिमत्व घटक प्रामुख्याने आढळून आले.
३. निम्न शैक्षणिक संपादन गुणांकधारक प्राथमिक शिक्षकात (स्त्री) (B-) कमी बुदिमत्ता व (L+) संशयी हे व्यक्तिमत्व घटक प्रामुख्याने आढळून आले.

### माध्यमिक शिक्षक -

१. उच्च शैक्षणिक संपादन गुणांकधारक माध्यमिक शिक्षकात (पुरूष) (Q4+) मानसिक तणाव असलेला, तणावग्रस्त हा व्यक्तिमत्व घटक प्रामुख्याने आढळून आला.
२. उच्च शैक्षणिक संपादन गुणांकधारक माध्यामिक शिक्षकात (स्त्री) (B-) कमी बुध्दिमत्ता हा व्यक्तिमत्व घटक प्रामुख्याने आढळून आला.

### उच्च माध्यमिक शिक्षक -

१. उच्च शैक्षणिक संपादन गुणांकधारक उच्च माध्यमिक शिक्षक (पुरूष) (Q1-) पुराणमतवादी व (Q3-) अनियंत्रित, बेशिस्त हे व्यक्तिमत्व घटक प्रामुख्याने आढळून आले.
२. उच्च शैक्षणिक संपादन गुणांकधारक उच्च माध्यामिक शिक्षकात (स्त्री) (L+) संशयी हा व्यक्तिमत्व घटक विशेषत्वाने आढळून आला.
३. निम्न शैक्षणिक संपादन गुणांकधारक उच्च माध्यामिक शिक्षकात (पुरूष) (F-) गंभीर हा व्यक्तिमत्व घटक प्रामुख्याने आढळून आला.
४. निम्न शैक्षणिक संपादन गुणांकधारक उच्च माध्यामिक शिक्षकात (स्त्री) (L+) संशयी व (Q2+) स्वयंपूर्ण हे व्यक्तिमत्व घटक विशेषत्वाने आढळून आले.

### संदर्भ ग्रंथसूचीः-


१. Allport, G.W., (1937), Personality a Psychological Interpretation, New York, Holt,
२. भांडारकर, पु.ल., (१९८७),सामाजिक संशोधन पध्दती, नागपूर, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ.
३. Cattell, R.B., (1946), Description And Measurement Of Personality, New York World Book.
४. Cattell, R.B. Sounders., (1950),The 16 PF Personality Factor, Questionnaire Campaigns, Lliionis Insto Press And Abil Testo.
५. दांडेकर, वा.ना., (१९९७),शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र,

| | | |
|---|---|---|
| | | श्री विद्या बुक्स, पुणे. |
| ६. | Guilford, J. P., | (1959), Personality, New Yark, McGraw-Hill. |
| ७. | Guilford, J. P., B., And Frachter | (1981), Fundamental Statistics In Psychology And Education, Auckland Mcgraw – Hill Book Company. |
| ८. | खरात, आ.पा., | (१९७१), प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र, श्री. विद्याप्रकाशन, पुणे. |
| ९. | मुळे, रा.श. आणि, उमाटे वि.तु. | (१९९८),शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, विद्या बुक्स, औरंगाबाद. |